दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १२३ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.५ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## अबू आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

# औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्यांना निलंबित करा-एकनाथ शिंदेंची विधासभेत मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अबू आझमी यांनी औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्या काळात देशाचा जीडीपी २४ टक्के होता. भारताची सीमा अफगाणिस्तान आणि म्यानमारपर्यंत होती, असे म्हणत औरंगजेब आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यात धर्माची नाही, तर सत्तेसाठी होती, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाचे पडसाद विधानसभेतही पाहायला मिळाले. औरंगजेबाचे गोडवे गायल्याबद्दल सपाचे आमदार अबू आझमी यांच्यावर गुन्हा दाखल करावा, औरंगजेबाचे गुणगान गाणाऱ्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, असेही शिंदे म्हणाले.

अबू आझमी यांच्या औरंगजेबावरील वक्तव्यावरून सभागृहात गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. अबू आझमींना निलंबित करावे आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी सत्ताधारी नेत्यांकडून करण्यात आली होती. या मागणीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहाचे आजचे दिवसभराचे कामकाम स्थगित केले.काल, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या मारेकऱ्याचे म्हणजेच औरंग्याचे गोडवे, याठिकाणी अबू आझमीने गायले. खरे म्हणजे अबू आझमीचा निषेध करायला हवा. अबू आझमीचा धिक्कार करतो. अबू आझमीचा धक्कार करत असताना, अबू आझमीने यापूर्वी देखील छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अतिशय चुकीचे वक्तव्य केले होते. अबू आझमी वारंवार छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा जाणीवपूर्वक अपमान करतो, असा आरोपी उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांनी सभागृहात बोलताना केला.छत्रपती संभाजी महाराजांनी देशासाठी बलिदान केले, आपल्या प्राणाचे बलिदान केले मात्र धर्म बदलला नाही. अशा संभाजी महाराजांचा आणि शिवाजी महाराजांचा अपमान करणे, म्हणजे हा अबू आझमी देशद्रोही आहे. म्हणून या देशद्रोह्याला या सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. आपण 'छावा' बघा, रईस... छावा सिनेमा बघा, असे आवाहनही त्यांनी केले.छत्रपती संभाजी महाराजांवर ४० दिवस अनन्वित अत्याचार केले. त्यांचे डोळे काढले, त्यांची नखे काढली, त्यांची जीभ कापली, अंगावरची कातडी सोलून त्यावर मीठ टाकले, एवढा अपमान केला, चाळीस दिवस हा अत्याचार सुरू होता. धर्म बदला म्हणून सांगितले. अशा औरंग्याचे गोडवे गाणे म्हणजे आपल्या राष्ट्र पुरुषांचा अपमान आहे. आपल्या देशभक्तीचा अपमान आहे, असा घणाघात करत एकनाथ शिंदे यांनी

देश धरम पर मिटने वाला, शेर शिवा का छावा था।
महा पराक्रमी परम प्रतापी, एकही शंबू राजा था।।

हा शेर सभागृहात म्हटला.

शंभू राजाने ९ वर्षांत ६९ लढाया जिंकल्या. अरे लाज वाटायला हवी. या औरंगजेबाने आपली मंदिरे तोडून टाकली. आया-बहिणींवर अत्याचार केला. आया-बहिणींवर बलात्कार झाले. या औरंग्याने बापाला कैद केले, मुलांना मारून टाकले. २७ लोकांना मारले. असे सांगत, अबू आझमी निलंबित झाला पाहीजे आणि त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी एकनाथ शिंदे यांनी केली.

## उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला विरोधी पक्षनेतेपदाचा मार्ग मोकळा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाबाबत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला विधिमंडळाकडून सकारात्मक उत्तर मिळाले आहे. त्यामुळे ठाकरे गटाला विरोधी पक्षनेतेपद मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



महायुतीला विधानसभा निवडणुकीत २३२ जागांवर विजय मिळवून मोठे यश मिळाले, तर महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळू शकले नाही. महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाला दहा टक्के आमदार संख्येचा टप्पा गाठता आला नाही, त्यामुळे विधानसभेत विरोधी पक्षनेतेपद मिळणार नाही, अशी चर्चा सुरू होती. यासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने २५ नोव्हेंबर २०२४ रोजी विधिमंडळ सचिवांना पत्र लिहून स्पष्टीकरण मागितले होते. त्या पत्राला विधिमंडळाकडून उत्तर मिळाले असून, राज्याच्या विधानसभा नियमांमध्ये दहा टक्के संख्येची अट नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निर्णयामुळे विरोधी पक्षनेतेपदासाठी ठाकरे गटाच्या आमदारांमध्ये नावांची चर्चा सुरू झाली आहे.

### आदासा गणेश मंदिरात भक्तिमय वातावरण

## गडकरींच्या उपस्थितीत साडेचार हजार भाविकांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण

**नागपूर (वृत्तसंस्था)**

नागपूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र आदासा येथे रविवारी पहाटे एक अभूतपूर्व धार्मिक कार्यक्रम पार पडला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आयोजित सामूहिक अथर्वशीर्ष पठणासाठी साडेचार हजार भाविक स्वखर्चाने उपस्थित राहिले.

पुरातन गणेश मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात अथर्वशीर्षाच्या २१ आवर्तनांचे सामूहिक पठण करण्यात आले. नितीन गडकरी यांनी पत्नी



कांचन गडकरी आणि कुटुंबीयांसह या कार्यक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात 'प्रणम्य शिरसां देवं' आणि महिषासुरमर्दिनी स्तोत्राने झाली. त्यानंतर शंखनादानंतर अथर्वशीर्ष पठणाला प्रारंभ झाला. शंतनू बुटी, सचिन काळी, कौस्तुभ पेंडके, राम पांडे आणि चिन्मय बुटी यांनी व्यासपीठावरून मंत्रोच्चार व पठणाचे नेतृत्व केले.भाविकांनी पहाटेपासूनच मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. नागपुरातून पहाटे पाच वाजता बसेस आदासाकडे रवाना झाल्या. अनेक भक्त खासगी वाहनांनीही सहकुटुंब कार्यक्रमास पोहोचले. रेणुका देशकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## अखेर धनंजय मुंडे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अखेर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटात आ. धनंजय मुंडे यांचा राईट हँड समजला जाणारा वाल्मिक कराड हा मुख्य सूत्रधार असल्याचे चार्जशीट मध्ये नमूद करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले. त्यामुळे मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने होत होती. सोमवारी क्रूर हत्येचे फोटो प्रसारमाध्यमातून व्हायरल झाले. मारेकऱ्यांचे क्रौर्य पाहून राज्यभरात संतापाची लाट उसळली आणि राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याची



शक्यता निर्माण झाली. राज्यभरातील जनतेचा तीव्र रोष लक्षात घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सायंकाळी झालेल्या एका बैठकीत मुंडे यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज धनंजय मुंडे यांनी आपल्या झ-व ओएसडींच्या मार्फत आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तो तत्काळ स्वीकारला. सदरील राजीनामा पुढील कार्यवाहीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

### औरंगजेबानेही केले नसेल असे कृत्य करून ठेवले

## जातीतला वाद नसून ही प्रवृत्ती आहे;संतोष देशमुख हत्या प्रकरणावर बच्चू कडूंची संतप्त प्रतिक्रिया

**अमरावती (वृत्तसंस्था)**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व व्हिडिओ समोर आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरले आहे. आरोपींनी अत्यंत क्रूर व अमानुषपणे संतोष देशमुख यांची हत्या केली होती. संतोष देशमुख यांना मारहाण करताना व्हिडिओ देखील या नराधमांनी बनवले होते. या संपूर्ण घटनेवर संपूर्ण राज्यातून संतापाची लाट निर्माण झाली आहे. यावर प्रहार संघटनेचे नेते व माजी आमदार बच्चू कडू यांनी संतप्त प्रतिक्रिया देत थेट औरंगजेबाशी तुलना केली आहे.

संतोष देशमुख प्रकरणावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले, मला असे वाटते की एकंदरीत एवढी निर्घृण हत्या झाली आणि एवढे सगळे होऊन राजकारणी लोकांनी त्यावर राजकारण केले आहे. खरे तर हा दोन जातीतला वाद नसून ही प्रवृत्ती आहे. ज्या प्रमाणे संतोष देशमुखची हत्या झाली ती कशा प्रकारे झाली? ते कुठल्या प्रवृत्तीचे लोक होते? त्यांची जात कोणती होती? हा विषय महत्त्वाचा नाही. त्यांची जी प्रवृत्ती होती ती फार मला असे वाटते एखाद्या दुश्मनाच्याही म्हणजे औरंगजेबानेही केले नसेल असे कृत्य करून ठेवले आहे.पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, अशा प्रवृत्तीला ठेचण्यासाठी तुम्हाला इतकी वर्ष लागतात. ती प्रवृत्ती वाढली कशी? कोणी खतपाणी घातले? ही जबाबदारी तिथल्या पोलिस प्रशासनाची नाही का? हे सगळे कसे आहे डोंगर मोठा झाल्यानंतर आता तुम्ही उंदराची चाल चलत आहात. वास्तविक याच्यामध्ये हे सगळे हत्या झाली म्हणून उघडकीस आले. मग एकंदरीत चालू काय होते बीडमध्ये? कोणाच्या आशिर्वादाने चालू होते? राजकारण म्हणजे सगळेच काही असे समजणारे जे लोक आहेत आणि राजकारणासाठी काही पण, कुठे पण आणि कसे पण करण्याची जी प्रवृत्ती आहे या देशामधील लोकांमध्ये वाढली आहे त्याचे हे मोठे उदाहरण आहे.



# ओबीसींवरील अत्याचारावेळी ओबीसी नेते कुठे असतात?-प्रकाश आंबेडकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**

निवडणुकीच्या तोंडावर ओबीसी नेते मिरवताना दिसतात. पण प्रत्यक्षात ओबीसींवरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्याची वेळ येते तेव्हा हेच ओबीसी नेते कुठे गायब होतात? असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला. जालना जिल्ह्यातील भोकरदनमध्ये एका धनगर समाजाच्या कैलास बोऱ्हाडे यांच्यावर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर बोलत होते. या घटनेतील दोषींवर तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी आंबेडकर यांनी केली आहे. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, छगन भुजबळ, नवनाथ पडळकर, लक्ष्मण हाके, पंकजा मुंडे हे स्वतःला ओबीसींचे नेतृत्व करणारे म्हणवतात. मात्र, ओबीसी समाजावर अन्याय होत असताना हे कुठे असतात? जालना येथील या गंभीर घटनेकडे या नेत्यांनी अजूनही गांभीर्याने पाहिलेले नाही, ही बाब दुर्दैवी आहे. वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी त्या गावाला भेट दिली असून, पोलिसांकडे कारवाईची मागणी केली आहे. मात्र, केवळ एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वेळ मागितली असून, लवकरात लवकर कठोर कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे.या संदर्भात जालना जिल्ह्यातील ओबीसी संघटनांशी चर्चा झाली असून, त्यांनी ६ तारखेला मोर्चा आयोजित केला आहे. शासनाने तातडीने दोषींना अटक करावी, तसेच गावकऱ्यांनी ही अमानुष घटना उघड्या डोळ्यांनी पाहिली आहे, तर त्या गावावर सामूहिक दंड बसवावा, अशी मागणी ड. आंबेडकर यांनी केली आहे. तसेच तुम्ही जे पेरता, तेच उगवते. धार्मिक द्वेष पसरवल्याने राज्यातील सामाजिक सलोखा बिघडत आहे, अशी खंत ड. आंबेडकर यांनी या वेळी व्यक्त केली.बिहारमधील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती चळवळ सध्या बौद्ध समाजाच्या महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी संघर्ष करत आहे. या चळवळीला देशभरातील तसेच परदेशातील बौद्ध समाजाचा मोठा पाठिंबा मिळत आहे. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभा या दोन्ही संघटनांनी या चळवळीला वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभा यांनी पूर्ण पाठिंबा जाहीर केला असल्याचे वंचित बहुजन बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.प्रकाश आंबेडकर यांनी या आंदोलनावर बारकाईने लक्ष ठेवले असून चळवळीच्या मागण्यांना न्याय मिळावा यासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. महाबोधी मंदिर मुक्ती ही केवळ धार्मिक बाब नसून, ती भारताच्या राजनैतिक, सांस्कृतिक आणि परराष्ट्र संबंधांशी संबंधित महत्त्वाची चळवळ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार या प्रचंड चळवळीच्या मागण्यांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत आहे. बौद्ध धर्म हा भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी महत्त्वाचा आहे. भारताच्या बौद्धधर्मीय भागीदारीमुळे जपान, मंगोलिया, व्हिएतनाम, दक्षिण कोरिया, थायलंड, म्यानमार, श्रीलंका, नेपाळ आणि कंबोडिया यासारख्या देशांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले असल्याचेही डआंबेडकर यांनी म्हटले आहे.मोदी सरकारचे दुर्लक्ष हे केवळ भारतातील बौद्ध समाजाच्या भावनांचा अपमान नसून, भारताच्या राजनैतिक कूटनीति आणि परराष्ट्र संबंधांवरही घातक परिणाम करू शकते अशी शंका आंबेडकरांनी व्यक्त केली आहे. अधिक दु:खाची बाब म्हणजे देशातील विरोधी पक्षांनीही या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले आहे. असे म्हणत ड. आंबेडकरांनी आम्ही केंद्र सरकारला महाबोधी महाविहार मुक्ती चळवळीच्या मागण्यांना तातडीने मान्यता द्यावी आणि बौद्ध समाजाच्या भावनांचा सन्मान राखावा अशी विनंती केली आहे. वंचित बहुजन आघाडी आणि भारतीय बौद्ध महासभा या चळवळीला अखेरपर्यंत पाठिंबा देत राहतील आणि बौद्ध समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करतील. असेही ड. आंबेडकरांनी सांगितले.



# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ३७८२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील एकूणः ३७८२ शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.शनिवारी या कार्यक्रमाचे राज्यस्तरावरून दूरदृष्यप्रणालीद्वारे तर जिल्हास्तरावर बाबुपेठ येथील पी.एम. श्री. सावित्रीबाई फुले प्रा. उच्च शाळा येथे मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, मनपाच्या वैद्यकिय अधिकारी डॉ. नयना उत्तरवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. पराग जिवतोडे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील बालकांची सखोल आरोग्य तपासणी करून जन्मजात विकृती, बालपणातील आजार, जिवनसत्वाची कमतरता, विकासातील विलंब, किशोरवयीन स्वास्थ्य यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले. बाल स्वास्थ कार्यक्रम हा बालकांच्या उज्वल भविष्यासाठी महत्वाचा टप्पा असून सर्व संबंधित विभागांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा. तसेच प्रत्येक बालकांची आरोग्य तपासणी करून बालकांना निरोगी बालपण द्यावे, आवाहन मान्यवरांनी केले. यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात वैद्यकिय पथकांमार्फत विविध शाळा व अंगणवाड्यांमध्ये बालकांची आरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून सदर मोहिमेमध्ये मोफत उपचार, मोफत संदर्भसेवा व मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.चंद्रपुर जिल्हयातील १५ तालुक्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे उद्घाटन करून ३७८२ शालेय बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या दरम्यान २७५ बालकांवर शाळेतच उपचार करण्यात आले असून २१६ बालकांना पुढील उपचाराकरिता तज्ञ डॉक्टरांकडे संदर्भीत करण्यात आले आहे. आरोग्य तपासणी सोबतच राष्ट्रीय सिकसेल नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत शाळेतील बालकांची सिकलसेल आजाराची तपासणी करण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन योगिता आंबेकर यांनी तर आभार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी मानले. कार्यक्रमाला मेट्रन माया आत्राम, शाळेचे मुख्याध्यापक नागेश नीत, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम पथक, आरोग्य कर्मचारी, शालेय विद्यार्थी, शिक्षक आणि पालक उपस्थित होते.



# गोल्डन ड्रीम इंग्लिश स्कूल पाथरी येथे विज्ञान प्रदर्शन संपन्न

**पाथरी । प्रतिनिधी**

जागतिक विज्ञान दिनानिमित्त गोल्डन ड्रीम इंग्लिश स्कूल, पाथरी येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा या उद्देशाने हे प्रदर्शन घेण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शेख मुख्तार, मिलिंद पवार, मोहम्मद इलियास, शरीफ आणि अमोल भाले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ध्वनीचे प्रवर्तन, मानवी श्वसन प्रक्रिया, सौरमाला (सोलर सिस्टम), ज्वालामुखी यांसारखे वैज्ञानिक प्रयोग सादर केले. तसेच, प्रयोगांसाठी लागणारी उपकरणे आणि सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) यांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. नर्सरी ते सातवीच्या




सुमारे १९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तसेच पालकांनीही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून प्रयोगांचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांना प्रयोग सादर करण्यासाठी विज्ञान शिक्षिका प्रिया परतवाघ आणि राधा शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका प्रियांका गिराम, स्वाती लिपने, सविता सुरवसे, नीता जाधव, प्रियांका कोल्हे, सारिका साळवे, अनुराधा मटपती, प्रिया कदम, मनीषा बोराडे, शेख बुशरा, मंजू भरते, प्रशांत कांबळे, सूर्यवंशी आणि गौतम जांभाळे यांनी मेहनत घेतली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा बोबडे यांनी केले, तर संस्थापक अध्यक्ष सलीम आणि उपाध्यक्ष शेख शगिर यांनी आभार मानले.

# गंगापूर तालुक्यात वरखेड शिवारात दरोडा शेतकरी कुटुंबाला मारहाण करून गंभीर जखमी

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील वरखेड शिवारात सोमवारी (३ मार्च) पहाटेच्या सुमारास दरोडेखोरांनी शेतकरी कुटुंबावर हल्ला चढवत मोठ्या प्रमाणावर लूटमार केली. चोरट्यांनी औटे वस्तीवर धाड टाकत कुटुंबाला मारहाण केली आणि सव्वा लाखांचा ऐवज लुटून पसार झाले.

गट क्रमांक २१३ मध्ये अशोक भानुदास औटे (५५) हे कुटुंबासह वास्तव्यास होते. पहाटे ३:३० वाजता चार दरोडेखोरांनी त्यांच्या घराचा दरवाजा तोडून जबरदस्ती आत प्रवेश केला.यावेळी अशोक औटे, त्यांचा मुलगा गणेश अशोक औटे (४०), सून सोनाली गणेश औटे (३५) आणि नातू रुद्रा गणेश औटे (१४) यांना बेदम मारहाण करण्यात आली. चोरट्यांनी शस्त्रांचा धाक दाखवत सोने, चांदी आणि रोख रक्कम असा सुमारे सव्वा लाखाचा ऐवज लुटला. दरोडेखोरांनी औटे कुटुंबाचे मोबाईल हिसकावून शेतात दूर फेकून दिले तसेच शेतात सुमारे अर्धा एकर टरबूजाची नासाडी केली. घटनेनंतर अशोक औटे सकाळी ६:३० वाजता बाजूच्या शेतवस्तीवर जाऊन नातेवाईकांना फोनद्वारे माहिती दिली. दरोड्यात गंभीर जखमी झालेल्या अशोक आणि गणेश औटे यांना गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी सकाळी घटनास्थळी पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास ल्या गाव पोलीस ठाणे करीत आहे. भाजप आमदार प्रशांत बंब यांनी २८ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षकांना दिलेल्या पत्राद्वारे गंगापूर आणि खुलताबाद पोलिसांवर गंभीर आरोप केले होते. त्यांनी तालुक्यात वाढलेल्या चोरीच्या घटनांवर तीव्र नाराजी व्यक्त करत बेकायदेशीर धंदे आणि गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



# पाथरी तालुक्यात ग्रामीण भागात अवैध 'कल्याण-मुंबई' मटका जुगार तेजीत

## ढालेगाव, गुंज, हदगाव, वाघाळा, बाभळगाव फाटा हे जुगाराचे प्रमुख केंद्र

**पाथरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील ढालेगाव, गुंज, हदगाव, वाघाळा, बाभळगाव फाटा या ठिकाणी कल्याण-मुंबई नावाने मटका जुगार मोठ्या प्रमाणावर सुरू असून, याचा प्रादुर्भाव संपूर्ण ग्रामीण भागात वाढत आहे. या जुगारामुळे सामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांचीही फसवणूक होत असून, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत.

मटक्याचे मुख्य केंद्र म्हणून ढालेगाव, गुंज, हदगाव, वाघाळा, बाभळगाव फाटा ओळखले जात असले तरी, लिंबा, नाथरा, मरडसगाव, तुरा, विटा यांसारख्या गावांमध्येही हा अवैध धंदा मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. विद्यार्थी आणि युवक मोठ्या प्रमाणावर या जुगाराच्या आहारी जात असून, त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळत आहे.या अवैध जुगारावर स्थानिक प्रशासनाने कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. गावागावांत सुरू असलेला हा धंदा रोखण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी, अशी मागणी संतप्त नागरिकांकडून केली जात आहे. आता प्रशासन यावर ठोस कारवाई करून मटका जुगाराचा कायमचा बंदोबस्त करणार का? याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# राज्यस्तरीय युवा महोत्सव संपन्न

**कोल्हार । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर, नाशिक युवा प्रबोधन विभाग आणि श्री स्वामी समर्थ युवा प्रबोधन केंद्र, लोणी (दिंडोरी प्रणित) यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी येथे राज्यस्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.बालसंस्कार व युवा प्रबोधन विभागप्रमुख नितीन मोरे यांनी मार्गदर्शन केले. या महोत्सवात डॉ. शलाका शिंदे, सुहास पाटील (माजी सहाय्यक आयुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग) आणि विशाल मकवाना (आयकर आयुक्त) यांनी विविध विषयांवर सत्रे घेतली.



कार्यक्रमात रक्तदान शिबिर, मार्गदर्शन स्टॉल आणि प्रशिक्षण उपक्रम आयोजित करण्यात आले. प्रमुख उपस्थितीत उद्योजक विकास महाजन, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, नारायण पाडेकर, डॉ. रवी जाधव, प्रा. साईप्रसाद कुंभकर्ण, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे, पत्रकार शहाजी दिघे, गणेश सोमवंशी आणि वैभव ताजने यांचा समावेश होता.कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सूत्रसंचालन जोंधळे यांनी केले, तर आभार युवा प्रबोधन केंद्राच्या वतीने मानण्यात आले.

# चिंचवड स्टेशन येथे 'शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.०' संपन्न

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे, पुणे समग्र शिक्षा शिक्षण विभाग व पिं.चि. मनपा शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.०' कार्यक्रमाचे आयोजन महात्मा ज्योतिबा फुले मनपा शाळा, चिंचवड स्टेशन येथे करण्यात आले. सर्व शिक्षकांना आधुनिक शैक्षणिक प्रणालीत सक्षम बनविणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश होता.

प्रशिक्षण कार्यक्रमात सुलभक चंद्रकांत अंबुरे, योगेश ढावरे, आनंद डावरे, शिवराज वायचळ, गणेशदेव सोन्नर, किरण भामरे, निवृत्ती ठानवे, सतीश जगताप, अभयकुमार



हाजगुडे, विभीषण खोसे, सचिन पुराणे, संतोष कपाळे, दत्तात्रय कोळी, किशोर तारडे, बाळासाहेब जाधव आणि सतीश मेहेर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणाच्या नियोजनासाठी राजेंद्र मोहिते, प्रदीप शिंदे, भारती माळी आणि सुनंदा भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित अध्यापन, समग्र प्रगतिपत्रक, व्यवसायाभिमुख शिक्षण यावर चर्चा झाली. गटकार्य व सखोल मार्गदर्शनाच्या माध्यमातून शिक्षकांना आधुनिक शिक्षण पद्धतींबाबत सुस्पष्ट माहिती देण्यात आली. प्रशिक्षणास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात आणि प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी भेट देऊन शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिक्षण पद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेकडे झुकत असलेल्या या युगात विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसन अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षकांनीही नव्या आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम असले पाहिजे, असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवडमध्ये चिंचवड स्टेशन आणि पिंपरी येथे हे प्रशिक्षण सुरू आहे. प्रत्येक टप्पा पाच दिवसांचा असून, शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश मेहेर यांनी केले, तर आभार सतीश मेहेर आणि राजेंद्र मोहिते यांनी मानले.

# कोगदे ग्रामपंचायतीत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**जव्हार । प्रतिनिधी**

राह फाउंडेशन, मुंबई-पालघर प्रकल्पाच्या वतीने कोगदे ग्रामपंचायत येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजनाने करण्यात आली. ग्रामपंचायत सरपंच मथुरा भासरा आणि सदस्य राऊत यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

मेळाव्यात २६५ महिलांनी सहभाग घेतला. टिकली लावणे, संगीत खुर्ची, लिंबू-चमचा शर्यत, गाणे, क्रिकेट आणि गोट्यांचा खेळ यांसारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. सर्व महिलांसाठी भोजन आणि स्कार्फ वाटपाची व्यवस्था करण्यात आली. राह फाउंडेशनच्या सर्वे स्टाफच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

# अरुण कोंबे यांचे निधन

**भद्रावती । प्रतिनिधी**



गौतम नगर गुरुनगर वार्ड येथील निवासी तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक दत्ताभाऊ कोंबे यांचे धाकटे बंधू अरुण कोंबे यांचे दि.३ मार्चला पहाटे ५ वाजता पायाच्या कर्क आजाराने स्थानीय खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा एक मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.त्यांच्यावर स्थानिक मल्हारा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

# पदमश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत कोपरगाव येथे स्वच्छता अभियान

**कोपरगाव । प्रतिनिधी**

डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तालुका अलिबाग येथील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पदमश्री पुरस्कार प्राप्त अप्पासाहेब तथा दत्तात्रय नारायण धर्माधिकारी यांचे मार्गदर्शनातून समाजामध्ये स्वछतेबद्दल व आरोग्याबाबत जनजागृती व्हावी या उद्देश समोर ठेऊन प्रतिष्ठान तर्फे रविवार २ मार्च रोजी स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी कोपरगाव बस स्थानक, पोस्ट ऑफिस, ग्रामीण रुग्णालय, पशु वैद्यकीय दवाखाना या ठिकाणी स्वछता करत अभियान राबविण्यात आले.

यावेळी कोपरगाव नगरपरिषचे मुख्याधिकारी सुहास जगताप, बापूसाहेब आरणे आरोग्य विभाग तसेच कर्मचारी वृंद यांचे विशेष सहकार्य लाभले. या स्वछता उपक्रमामध्ये गिरीश खेमनर वाहतूक निरीक्षक, अमित पोक्षे वाहतूक निरीक्षक, गिरीश गुट्टे वैद्यकीय अधीक्षक, जाधव , ढेपले , गोर्डे , दहे पशुधन विकास अधिकारी यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले



# गंगाखेड तालुक्यात बोर्ड परीक्षेतील अनागोंदी: विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे काय?

**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेड तालुक्यात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षांना सुरुवात झाली असून सुमारे ७९०० विद्यार्थी परीक्षा देत आहेत. मात्र, अनेक परीक्षा केंद्रांवर मूलभूत सुविधा अपुऱ्या असल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तालुक्यात १२ परीक्षा केंद्रे असून, त्यापैकी ४ शहरी आणि ८ ग्रामीण भागातील आहेत. जनाबाई माध्यमिक विद्यालय, सरस्वती माध्यमिक विद्यालय, व्यंकटेश माध्यमिक विद्यालय आणि ममता माध्यमिक विद्यालय ही शहरी केंद्रे आहेत, तर वागदरा, पिंपळदरी, राणीसावरग, माकणी, गोदरी, मालेवाडी, मरडसगाव आणि महातपुरी येथे ग्रामीण परीक्षा केंद्रे आहेत. शिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशांनुसार प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची सोय, योग्य आसनव्यवस्था आणि परीक्षेसाठी शांत वातावरण असणे आवश्यक आहे. मात्र, वास्तवात अनेक ठिकाणी या नियमांची पायमल्ली होताना दिसत आहे. शासनाने कॉपीमुक्ती अभियान राबवण्याच्या उद्देशाने अनेक नियम लागू केले असले तरी, त्यांची अंमलबजावणी अद्याप समाधानकारक नाही. वागदरा परीक्षा केंद्र वगळता अन्य ठिकाणी पालकांची गर्दी, पिण्याच्या पाण्याचा अभाव, परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव आणि विद्यार्थ्यांना बेंचवर बसून उत्तरपत्रिका सोडवण्याची वेळ येत आहे.विशेषतः कोद्री, इसाद, महातपुरी आणि माखणी या परीक्षा केंद्रांवर गोंधळाचे प्रमाण अधिक असून, विद्यार्थ्यांना योग्य वातावरण मिळत नसल्याची तक्रार पालकांकडून केली जात आहे. शासनाने परीक्षा केंद्रांसाठी जाहीर केलेले नियम केवळ कागदावरच राहिल्याचे दिसत आहे. शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासन यावर काय पावले उचलणार? आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता या परिस्थितीत कशी सुधारेल? हे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत.पालक वर्गातून शिक्षण विभाग आणि शाळांच्या व्यवस्थापनावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रशासन यावर काय उत्तर देणार? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



## श्रीक्षेत्र गोळवाडी येथे हनुमान व ओंकारेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिन सोहळा

**वैजापूर । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र गोळवाडी येथे दक्षिणमुखी हनुमान मंदिर आणि ओंकारेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची सुरुवात ४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता ध्वजारोहणाने होणार असून, श्री १०८ महामंडलेश्वर स्वामी विमलगिरीजी महाराज (दहेगाव आश्रम) यांच्या हस्ते ध्वज उभारला जाईल.

यानंतर अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होणार आहे. श्रीमद् भागवत कथा दररोज सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत होणार असून, ती आचार्य १०८ श्री स्वामी शतानंद गिरीजी महाराज (श्री सिद्ध गणेश मंदिर, शिवराई) यांच्या प्रवचनातून सादर होईल.१० मार्च रोजी (एकादशी) सकाळी ९ वाजता भागवताचार्य श्रीहरी महाराज वैष्णव (जालना) यांचे किर्तन होणार आहे.

कार्यक्रमाचा समारोप ११ मार्च रोजी मठाधिपती महंत ह. भ. प. श्री रामगिरीजी महाराज (गोदावरी धाम, सरला बेट) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.ग्रामस्थांनी या धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## सतीश आकुलवार यांची विदर्भ समन्वयक पदी निवड

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सतीश आकुलवार यांची डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र च्या विदर्भ समन्वयक पदी निवड करण्यात आली आहे.

२६ फेब्रुवारी रोजी शासकीय विश्राम गृह येथे छोटेखानी कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी नियुक्ती पत्र देऊन सतीश आकुलवार यांची संघटनेच्या विदर्भ समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र समन्वयक श्री. इक्बाल शेख हे प्रामुख्याने उपस्थित होते.



## पांडे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य आब्बास मुजावर यांचे निधन

**सोलापूर । प्रतिनिधी**

पांडे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य आब्बास बाबुलाल मुजावर (वय ८०) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.



तीन महिन्यांपूर्वी त्यांच्या पत्नीचे निधन झाले होते, त्यामुळे कुटुंबावर दुहेरी दुःख कोसळले आहे. रमजानच्या पवित्र महिन्यातच त्यांचे अकस्मात निधन झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मुजावर हे पत्रकार दस्तगीर मुजावर यांचे चुलते होते. त्यांच्या निधनाने सामाजिक आणि राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे.


## दहिगाव उपसा सिंचन योजनेचे ५००० हेक्टर क्षेत्र रब्बी आवर्तनात वंचित

**सोलापूर । प्रतिनिधी**

दहिगाव उपसा सिंचन योजनेसंदर्भात आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाही ५००० हेक्टर क्षेत्र अजूनही पाण्यापासून वंचित असून, शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. योजनेचे एकूण १०,५०० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येते, मात्र सालसे (१९३ हेक्टर), आळसुंदे (२०२ हेक्टर), लव्हे (६४३ हेक्टर), पांडे (४०८ हेक्टर), फिसरे (३०५ हेक्टर), हिसरे (१२७ हेक्टर) या गावांना रब्बी आवर्तनाचे पाणी मिळालेच नाही. साडेगाव (१६८९ हेक्टर) मध्ये केवळ सरकारी तलावालाच पाणी देण्यात आले असून, तेली तलाव, भागूटे तलाव आणि ओढ्यावरील बंधारे अद्याप कोरडे आहेत.

कोंढेज तलावावर वरकटणे (७९२ हेक्टर) आणि कोंढेज (५०२ हेक्टर) ही दोन गावे अवलंबून आहेत, मात्र हा तलाव अजूनही पाण्याविना आहे. म्हसेवाडी, लव्हे, नेरले, फिसरे आणि शेलगाव येथील तलाव व बंधारेही या आवर्तनात वंचित राहिले.पाटील गटाकडून या आवर्तनात १० पंप सुरू केल्याचा दावा करण्यात आला आहे, मात्र ५० दिवस आवर्तन चालू असूनही ५००० हेक्टर क्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही. त्यामुळे या १० पंपांचे पाणी गेले कुठे? असा प्रश्न संतप्त शेतकरी विचारत आहेत.

### जाणीवपूर्वक पाणी दिले नाही-रणजीत देवकर, वरकटणे



**कोंढेज तलाव हा तालुक्यातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा तलाव आहे. माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या कार्यकाळात हा तलाव दोन वेळा ओव्हरफ्लो झाला होता. मात्र, या रब्बी आवर्तनात जाणीवपूर्वक पाणी दिले नाही, असा आरोप रणजीत देवकर (वरकटणे) यांनी केला.राजकीय आकस न ठेवता उन्हाळी आवर्तनाचे पाणी तरी द्यावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.**

## गावाच्या पहिल्या महिला डॉक्टर कन्येचा गौरवपूर्ण सत्कार

**दहेगाव (गावंडे) । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात शिक्षणाच्या संधी मर्यादित असतानाही जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यशाची उंच शिखरे गाठणाऱ्या महिलांचा प्रवास प्रेरणादायी असतो. अशाच जिद्दीने स्वतःचं स्वप्न पूर्ण करणाऱ्या डॉ. वैष्णवी चंद्रशेखर घाटे हिने गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.




दहेगाव (गावंडे) या गावातील ती प्रथम महिला डॉक्टर होण्याचा मान पटकावला आहे. तिच्या या यशाचा गौरव नुतन स्पोर्टिंग क्लब तर्फे गावातील वार्षिक कबड्डी स्पर्धेच्या समारोपप्रसंगी करण्यात आला. पुलगाव-देवळीचे आमदार राजेश बकाने व भाजप जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांच्या हस्ते वैष्णवीचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.गावातील सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या वैष्णवीने कष्ट, अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. तिच्या यशामुळे गावातील इतर तरुणींना शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार आहे.सत्कारप्रसंगी गावातील नागरिक, महिला मंडळ, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तिच्या यशाचे कौतुक केले. वैष्णवीचे यश हे मुलींच्या शिक्षणाला पाठबळ द्या, त्या नक्कीच मोठी झेप घेतील या उक्तीला साजेसं ठरत आहे.प्रत्येक मुलीने मोठी स्वप्नं पाहावीत आणि मेहनतीने ती साकार करावीत... हा संदेशच वैष्णवीच्या यशातून मिळतो!

## महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावा वंचित बहुजन आघाडीचे धरणे आंदोलन

**गंगाखेड । प्रतिनिधी**

महाबोधी ॲक्ट १९४९ रद्द करून बोधगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावा, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ७ मार्च २०२५ रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

बोधगया येथील महाबोधी महाविहार हा बौद्ध समाजासाठी पवित्र व ऐतिहासिक स्थळ असून, त्यावर बौद्ध समाजाचा संपूर्ण अधिकार असावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




महाबोधी ॲक्ट १९४९ नुसार सध्या या महाविहाराच्या व्यवस्थापनात बौद्धांपेक्षा इतर घटकांचा हस्तक्षेप असल्याने, तो रद्द करून संपूर्ण नियंत्रण बौद्ध समाजाकडे द्यावे, असा आग्रह वंचित बहुजन आघाडीने धरला आहे.

या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुनील मगरे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष पंडितराव पारवे, महासभेचे माजी तालुकाध्यक्ष लखन अण्णा साळवे, समता सैनिक दलाचे रमेश सूर्यवंशी, वंचित नेते ड. कैलास झुंजारे, शुद्धोदन सावंत (लातूर जिल्हा पक्षनिरीक्षक व परभणी जिल्हा संघटक), बसपा नेते शिवराज पैठणे, कृष्णा सावंत (जिल्हा संघटक), आकाश गायकवाड (युवक जिल्हा उपाध्यक्ष), हैदरभाई पठाण (तालुका उपाध्यक्ष), लहूदास केदारे (तालुका प्रसिद्धी प्रमुख), प्रवीण रायभोळे (रास्त भाव दुकानदार संघटनेचे जिल्हा सचिव), संतोष काळे (समता सैनिक दल), तसेच प्रमोद कचरूबा रायभोळे (समता सैनिक दल) यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.गंगाखेड येथे होणाऱ्या या धरणे आंदोलनाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रोजा सोडण्यासाठी फळे खरेदी साठी मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी



**पिशोर । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याला २ मार्चपासून सुरुवात झाल्याने मुस्लिम बांधव रोजा (उपवास) ठेवत आहेत. संध्याकाळी उपवास सोडण्यासाठी फळे आणि विविध खाद्यपदार्थ खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे.पिशोरच्या जामा मस्जिदसमोर आणि मुख्य बाजारपट्टीत फळे व खाद्यपदार्थांची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली जातात. सायंकाळच्या वेळी टरबूज, केळी, खरबूज, पपई, संत्री, चिकू, सफरचंद, पेंड, खजूर आणि अन्य पदार्थांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जात आहे. दरवर्षीप्रमाणे रमजानच्या काळात बाजारपेठेत मोठी चहलपहल दिसून येत असून, व्यापाऱ्यांना देखील याचा लाभ होत आहे.

## स्नेहा बारवे यांच्यावरील हल्ल्याचा इंदापूरात तीव्र निषेध; मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

**इंदापूर । प्रतिनिधी**

संपादिका स्नेहा बारवे आणि पत्रकार समीर राजे यांच्यावर मंचर येथे बिल्डर आणि त्याच्या नातेवाईकांनी हल्ला करत अश्लील शिवीगाळ, धक्काबुक्की आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांबाबत राज्य सरकार ठोस भूमिका घेणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे.

मंचर शहरातील एस कॉर्नर परिसरातील नाविन्य रेसिडेन्सी इमारतीच्या डेव्हलपरने अनधिकृत बांधकाम, वीज चोरी आणि फ्लॅट विक्रीत फसवणूक केली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यासंदर्भात पत्रकारांनी माहिती गोळा केली, हे उघड होऊ नये म्हणून बिल्डर संतापला आणि हल्ला केला, असा आरोप आहे. हल्ल्याच्या वेळी स्नेहा बारवे यांना धक्काबुक्की करून हातावर फटका मारण्यात आला.

या हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य जनसेवा पत्रकार संघटना आणि इंदापूर जनसेवा पत्रकार संघटनेने तीव्र संताप व्यक्त केला. इंदापूर तहसीलदार जीवन बनसोडे आणि पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.यावेळी संघटनेचे अध्यक्ष शिवाजी पवार, अतुल सोनकांबळे, महेश गडदे, अशोक घोडके, दत्तात्रय मिसळ, सत्यजित रणवरे, दत्ता पारेकर, संजय शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**महाराष्ट्रात वारंवार पत्रकारांवर हल्ले होत आहेत, मात्र शासन गंभीर दिसत नाही. समाजाच्या समस्या मांडणाऱ्या पत्रकारांवर गुंड हल्ले करत आहेत. हे थांबवण्यासाठी शासनाने कडक कारवाई करावी.**

**-महाराष्ट्र राज्य जनसेवा पत्रकार संघटना**

## पराभवाने खचून न जाता नव्या जोमाने कामाला लागा-बाळराजे पाटील

### डिकसळ येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन संपन्न

**मोहोळ । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत जरी पराभव झाला असला, तरी कार्यकर्त्यांनी खचून न जाता नव्या जोमाने कामाला लागावे. लोकनेते परिवार हा नेहमी कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असे प्रतिपादन लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी केले.

मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथे माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनातून आणि माजी आमदार यशवंत माने यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन बाळराजे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत या समारंभास मार्केट कमिटीचे संचालक गोविंद पाटील, सरपंच बळीराम गुरव, खरेदी-विक्री संघाचे माजी चेअरमन आबासाहेब धावणे, सुरेश धावणे, हनुमंत धावणे, पंडित ढवण, अमर चव्हाण, अरुण धावणे, समाधान ताकमोगे, नाना राऊत, सोमनाथ धावणे, निलकंठ धावणे, गोरख गाटे, जाईबाई गायकवाड, संजय धावणे, सुभाष धावणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकास कामांच्या माध्यमातून गावाचा विकास वेगाने होत राहील, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



# ग्रामगीता महाविद्यालय,चिमूर येथे राष्ट्रीय परिषद संपन्न; संशोधन आणि संवर्धनावर विचारमंथन

**चिमूर । प्रतिनिधी**

ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथे नॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसेंट मल्टी-डिसिप्लिनरी ॲडव्हान्सेस इन रिसर्च ॲंड कंजर्वेशन या विषयावर राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये वनसंवर्धन, संशोधन आणि तंत्रज्ञान यासंदर्भात सखोल विचारमंथन करण्यात आले. परिषदेच्या सत्रात मार्गदर्शन करताना प्रा. रमजान ईरानी यांनी मानव-वन्यप्राणी संघर्ष हा मानवनिर्मित असल्याचे सांगितले. मानव आपल्या स्वार्थासाठी वन्य प्राण्यांच्या अधिवासांवर अतिक्रमण करत आहे, त्यामुळे अन्नसाखळी विस्कळीत होत आहे. खऱ्या अर्थाने वन्यजीवांचे संवर्धन करण्यासाठी भूपातळीवर कार्य करण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. वनसंवर्धनासंदर्भात डॉ. गजानन मुरतकर यांनी वन परिसरातील गवताळ भूमीच्या व्यवस्थापनावर भर दिला. गवताळ प्रदेश हा तृणभक्षी वन्यप्राण्यांसाठी महत्त्वाचा असून, त्याच्या संवर्धनामुळे जैवविविधतेत वाढ होते, असे त्यांनी संशोधनाच्या आधारे सांगितले. यंग सायंटिस्ट म्हणून निमंत्रित डॉ. अजिंक्य कोट्टावार यांनी भारतातील जुगाड तंत्रज्ञानाचा उल्लेख करत, त्याला वैज्ञानिक स्वरूप देण्याची आवश्यकता व्यक्त केली. जुगाडाला शाश्वत तंत्रज्ञानात रूपांतरित करून पेटंट घेण्याकडे लक्ष दिल्यास मोठे संशोधन घडू शकते, असे त्यांनी सांगितले. या राष्ट्रीय परिषदेत १८० शोधनिबंधांचे संकलन प्रकाशित करण्यात आले. परिषदेला ३०० हून अधिक संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी पोस्टर स्पर्धा आणि मौखिक




सादरीकरण आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली, हिस्लॉप कॉलेजचे सीएचएलआर प्राणीशास्त्र विभागाचे संचालक डॉ. रेमंड जे. अँड्रयू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुरेंद्र माणिक, समन्वयक प्राचार्या डॉ. सुनंदा आस्वले उपस्थित होते. या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. हुंगे, डॉ. संजय साबळे, डॉ. मनोज अरमरकर, डॉ. संदीप कागे, डॉ. राहुल मापारी, डॉ. नरेंद्र हरणे, डॉ. पायल वर्मा, डॉ. निलेश उगेमुगे, डॉ. अतुल नागपुरे, डॉ. प्रशांत वाघ, डॉ. प्रवीण गांजरे यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. निलेश ठवकर, प्रा. विवेक माणिक, डॉ. मृणाल वऱ्हाडे, प्रा. संदीप मेश्राम, डॉ. हुमेश्वर आनंदे, डॉ. युवराज बोधे, डॉ. प्रणाली टेंभुर्ने, डॉ. संदीप सातव, प्रा. नागेश ढोरे, डॉ. बिजनकुमार शील, प्रा. रोहित चांदेकर आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामगीता महाविद्यालयात संपन्न झालेली ही परिषद वनसंवर्धन, जैवविविधता आणि तंत्रज्ञान यासंदर्भातील संशोधनाला चालना देणारी ठरली.

# इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीतर्फे 'वायरमन डे' साजरा; कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांचा सन्मान

**इंदापूर । प्रतिनिधी**

महावितरणच्या कर्मचाऱ्यांची सेवा आणि समर्पण ओळखून त्यांचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे, या भावनेतून इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीच्या वतीने 'वायरमन डे' निमित्त महावितरणच्या कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, इंदापूर येथे हा कार्यक्रम पार पडला. लाईनमन राहुल पळसे, महेश टफले, फारुख शेख, दत्तात्रेय देवकर तसेच वीज वितरण विभागाचे अधिकारी प्रमोद कुमार जाधव, उप कार्यकारी अभियंता गणेश जाधव, उत्तम गायकवाड, शिपाई सतीश बनसोडे, दीपक चौगुले यांचा



हार, गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीचे प्रमुख प्रा. कृष्णा ताटे, मार्गदर्शक हमीदभाई आत्तार, पदाधिकारी महादेव चव्हाण, नगरसेवक अमर गाडे, भारत बोराटे, अस्लम बागवान, माऊली राऊत यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.अहोरात्र नागरिकांसाठी सेवा देणाऱ्या वायरमन व कर्मचाऱ्यांचे योगदान समाजासाठी मोलाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# हॉजीकॉन कॅफेमध्ये तलवारीचा धाक व्यवसायिकाला जीवे मारण्याची धमकी

**शिरूर । प्रतिनिधी**

बाबुरावनगर येथील हॉजीकॉन कॅरम कॅफेमध्ये एका इसमाने तलवारीचा धाक दाखवत दहशत माजवली. ही घटना ३ मार्च २०२५ रोजी रात्री ११ वाजता घडली.

या प्रकरणी आरबाज रहीम शेख (वय २३, व्यवसाय - स्कप सेंटर, रा. सय्यद बाबा नगर, शिरूर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी आपल्या मित्रांसह कॅफेमध्ये असताना नारायण गव्हाणे (रा. कुकडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि त्याचा साथीदार बंटी घोडे (रा. गुजरमळा, शिरूर) मारुती सिलेरो कारने कॅफेमध्ये आले. नारायण गव्हाणे याने हातात



तलवार घेत फिर्यादीला धमकावत - तु मला ओळखत नाही का? इथला धंदा करायचा असेल, तर माझी परवानगी घ्यावी लागेल, नाही तर धंदा करायचा नाही! असे म्हणत शिवीगाळ केली. यानंतर त्याने तलवारीने फिर्यादीवर वार करण्याचा प्रयत्न केला तसेच कॅफेतील टेबल-खुर्च्या अस्ताव्यस्त फेकून दिल्या. हल्ल्यानंतर गव्हाणे याने कॅफेबाहेर तलवार फिरवत दहशत निर्माण केली, ज्यामुळे परिसरातील दुकानदारांनी घाबरून दुकाने बंद केली आणि नागरिकांमध्ये पळापळ झाली. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्र. १५१/२०२५ अंतर्गत भादंवि कलम ३५२, ३५१(२)(३), ४, २५ तसेच फौजदारी सुधारणा कायदा २०१३ अंतर्गत कलम ३, ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार जगताप (ब. नं. २५) करत असून, गुन्हा दाखल करणारे अधिकारी पोलीस हवालदार वारे (ब. नं. ८५०) आहेत. पुढील तपास सुरू असून आरोपींच्या हालचालींवर पोलिसांचे लक्ष आहे.

## ठाण्यात शिवसेनेचे आंदोलन

# वाल्मिक कराडला फाशी द्या या मागणीसाठी संतप्त घोषणाबाजी



**ठाणे । प्रतिनिधी**

मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ शिवसेनेने ठाण्यात जोरदार आंदोलन केले. या प्रकरणात मुख्य आरोपी वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांना फाशी द्यावी अशी मागणी शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी केली.या संदर्भात प्रतिक्रिया देताना म्हस्के यांनी कराडला 'क्रूरकर्मा' संबोधले. संतोष देशमुख यांची हत्या हा केवळ गुन्हा नाही, तर माणुसकीवरचा मोठा डाग आहे. गावाच्या हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या देशमुख यांना निर्दयपणे संपवले गेले. गुन्हेगार आणि त्याच्या साथीदारांवर तातडीने फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट के

या हत्याकांडाच्या निषेधार्थ संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनेने मोर्चे काढले, तसेच ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान वाल्मिक कराडला भर चौकात फाशी द्या! अशा संतप्त घोषणा देण्यात आल्या.

आज जर गुन्हेगारीला मोकळीक दिली, तर उद्या पुन्हा एखादा न्यायप्रिय माणूस गुन्हेगारांच्या तावडीत सापडेल. त्यामुळे हा लढा न्याय मिळेपर्यंत सुरू राहील असे म्हस्के यांनी ठामपणे सांगितले.

या आंदोलनात शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक, माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राज्य सरकारने तातडीने कठोर कारवाई करावी अन्यथा शिवसेनेचा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशाराही देण्यात आला.

# श्री क्षेत्र वारी येथे भव्य साई चरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन

**कोपरगाव । प्रतिनिधी**

श्री साईसेवा पदयात्री मंडळाच्या वतीने श्री क्षेत्र वारी येथे भव्य साई चरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पवित्र सोहळा गुरुवार, २७ फेब्रुवारी २०२५ पासून बुधवार, ५ मार्च २०२५ पर्यंत संपन्न होणार आहे. यंदा या सोहळ्याचे २० वे वर्ष असून, मोठ्या भक्तिभावाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ६ ते ९ या वेळेत बालकांपासून वृद्ध भक्तपर्यंत सर्वजण सेवा करत असतात. या सोहळ्यात महिला भगिनींची विशेष उपस्थिती असते, आणि वातावरण भक्तिरसाने भारलेले असते. बुधवार, ५ मार्च रोजी सकाळी १० ते १२ या कालावधीत रामायणाचार्य ह.भ.प. पारस महाराज जैन यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, ६ मार्च रोजी सकाळी ६ वाजता डीजे वाद्यवृंदाच्या निनादात, हजारो साईभक्तांच्या जयघोषात श्री क्षेत्र वारी येथून साईबाबांच्या शिर्डी नगरीकडे पदयात्रेला सुरुवात होईल. भाविकांनी मोठ्या संख्येने या भक्तिमय सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# जि.प.शाळा वाकडपाडा व ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छता अभियान राबविले



**जव्हार । प्रतिनिधी**

मोखाडा तालुक्यात स्वच्छता अभियानाच्या उपक्रमांतर्गत वाकडपाडा गाव व परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेत जिल्हा परिषद शाळा वाकडपाडा येथील विद्यार्थ्यांनी तसेच ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी गावातील रस्ते, चौक, गल्लीबोळांची स्वच्छता केली.

पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप वाघ यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. तसेच सरपंच लता वारे, उपसरपंच नंदकुमार वाघ, ग्रामसेवक खाडे, केंद्रप्रमुख मनोहर पावरा, मुख्याध्यापक सुहास दिनकर, शिक्षक कुंदन चौधरी, शतानंद भेरे, अंगणवाडी सेविका अनुसया खाडे, पूजा वाघ, अबोली सारक्ते, संगीता गोडे, वेणुताई वाघ आणि रोजगार सेवक विलास गवारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते या अभियानाच्या माध्यमातून गाव स्वच्छ ठेवण्याचा संदेश देण्यात आला, तसेच स्वच्छतेच्या महत्त्वाबाबत उपस्थित ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# श्री संत जनार्दन स्वामी संस्कार संस्था व गुरुकुलतर्फे शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांचा सत्कार

**वैजापूर**–छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी आदरणीय अश्विनी लाटकर यांच्या प्रकट दिनानिमित्त श्री संत जनार्दन स्वामी संस्कार संस्था, वेरूळ आणि गुरुकुल महालगाव यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



४ मार्च रोजी महालगाव येथील श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल येथे हा कार्यक्रम पार पडला. संस्थेच्या वतीने श्री राठोड के.बी. आणि श्री मच्छिंद्र जाधव यांच्या हस्ते शिक्षणाधिकारी लाटकर यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज (वेरूळ आश्रम) यांचा विशेष शुभसंदेश शिक्षणाधिकारी यांना देण्यात आला. कार्यक्रमास महालगाव गुरुकुलचे मुख्याध्यापक श्री. ढोबळे डी.एस. तसेच श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल संस्थेचे शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांना संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

# चिखली जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचे कोकण दर्शन; ऐतिहासिक, भौगोलिक आणि वैज्ञानिक ज्ञानासोबतच मनोरंजनाचा आनंद

**मोहोळ । प्रतिनिधी**

चिखली (ता. मोहोळ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी तीन दिवसांच्या कोकण दर्शन सहलीचा अनुभव घेतला. या सहलीत निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक किल्ले, समुद्रकिनारे, तसेच कोकणातील जैवविविधता यांचा प्रत्यक्ष अभ्यास करून विद्यार्थ्यांना अभ्यासाबाहेरील मौल्यवान ज्ञान मिळाले.

विद्यार्थ्यांनी वाईच्या ढोल्या गणपतीचे दर्शन घेत सहलीची सुरुवात केली. पाचगणीच्या पारशी पॉईंटवर फोटोसेशन व स्ट्रॉबेरी बर्फाचा आनंद घेतला. महाबळेश्वरमध्ये घोडेस्वारीचा थरार अनुभवला.

सायंकाळी प्रतापगडाच्या उंच टप्प्यांवर शिवरायांच्या पराक्रमास अभिवादन करत पाचाड गाठले. पहाटेच्या अंधुक उजेडात जय भवानी, जय शिवाजी, जय शंभूराजे अशा गगनभेदी घोषणांसह विद्यार्थ्यांनी चित्त दरवाजातून रायगड सर करण्यास सुरुवात केली. विद्यार्थ्यांनी हिरकणी बुरुज, बाराटाकी शिबंदीचा घरटा, गंगासागर तलाव, वाघदरवाजा, नाणे दरवाजा, गडदेवता शिर्काई देवी, टकमक टोक, महादरवाजा, सिंहासनाजवळील नगारखाना आणि दरबार हा विभाग पाहिला. नगारखान्यात प्रतिध्वनीत ऐकू आलेला कागद फाडण्याचा आवाज विद्यार्थ्यांना विस्मयचकित करणारा ठरला. रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, जगदीश्वर मंदिर, शिलालेख, हनुमान टाके, राणी वसाहत, बाजारपेठ व दारु कोठार यांचे निरीक्षण करत विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकांकडून



ऐतिहासिक माहिती आत्मसात केली. शेवटी, जिथे छत्रपती शिवाजी महाराजांनी अखेरचा श्वास घेतला त्या ठिकाणची माती कपाळी लावून विद्यार्थ्यांनी गड उतरण्यास सुरुवात कली. रायगड दर्शनानंतर मातोश्री जिजाऊ साहेबांच्या पुतळ्यास अभिवादन करून श्रीवर्धनच्या दिशेने प्रवास सुरू झाला. सायंकाळी श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर विद्यार्थ्यांनी समुद्राचे प्रत्यक्ष अनुभव घेत विविध खेळ खेळले. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी दिवेआगर बीचवर समुद्राच्या फेसाळत्या लाटांवर स्वार होत समुद्रस्नानाचा आनंद घेतला. दिघी जेट्टीतून मोठ्या बोटीतून समुद्र प्रवास करत जंजिरा किल्ला पाहिला. विद्यार्थ्यांनी भग्नावस्थेतील इमारती, गोड्या पाण्याचे तलाव, ऐतिहासिक तोफा यांची पाहणी करून इतिहासातील महत्त्वाच्या घटकांची माहिती घेतली. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना कोकणातील निसर्गसंपत्ती, गडकोट, समुद्रकिनारे यांचा अभ्यास करून ऐतिहासिक, भौगोलिक आणि वैज्ञानिक ज्ञानाचा खजिना गवसला. शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने बस चालक संदीप क्षीरसागर यांचा उपाध्यक्ष श्रीनिवास यादव यांनी पालकांच्या उपस्थितीत फेटा बांधून, शाल-श्रीफळ आणि रोख बक्षीस देऊन सत्कार केला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .